॥ सा विद्या या विमुक्तये ॥

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

Fax : (02462) 299574
Ext. No 143, 153

**POST GRADUATE SECTION**

website: srtmun.ac.in
E-mail: pg@srtmun.ac.in

जा.क्र.पदव्युत्तर/२०२५–२०२६/6906 दिनांक : ०८/०४/२०२६

# परिपत्रक

## तात्काळ कालमर्यादीत

प्रती,
मा. प्राचार्य/ संचालक,
सर्व सलग्नीत महाविद्यालय,
प्रस्तुत विद्यापीठ.

या परिपत्रकान्वये आपणास कळविण्यात येते की, उच्च शिक्षण घेणा–या एकल महिलांच्या पाल्यांची आकाडेवारी सादर करण्याबाबत सोबत जोडलेल्या पत्रान्वये शासनाचे सुचित केलेले आहे. तरी आपण आपल्या महाविद्यालयात प्रवेशीत असलेल्या व उच्च शिक्षण घेणा–या एकल महिलांच्या पाल्यांची सोबत जोडलेल्या तक्त्यानुसार उलट टपाली दि. १०/०४/२०२६ दुपारी ४.०० वाजेपर्यंत शासनाच्या पत्रात नमुद केलेल्या ई–मेल आयडीवर पाठविण्यात यावी व याची एक प्रत pg@srtmun.ac.in पदव्युत्तर विभागास सादर करावी हि विनंती.

आपला विश्वासु

उपकुलसचिव
पदव्युत्तर विभाग

सोबत,
१. शासनाचे पत्र

स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड-४३१६०६
आवक क्र. 3185 दिनांक 07/04/26

# महाराष्ट्र शासन

## उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

४१२ ई, बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६
Web : www.dhepune.gov.in E-Mail : mavi.dhepune@gov.in
फोन नं.०२०/२६१२२११९

स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड
कुलसचिव कार्यालय
06 APR 2026
आवक क्र. 190

क्र. उशिस/एकल महिला पा.मा /मवि-१/ई. २६८७१५४ दि.०६.०३.२०२६

प्रति,
कुलसचिव,
सर्व अकृषी /अभिमत/ स्वंयअर्थसहायीत विद्यापीठे

विषयः- उच्च शिक्षण घेणाऱ्या एकल महिलांच्या पाल्यांची आकडेवारी संकलित करणेबाबत.

संदर्भः- शासन पत्र क्र. संकीर्ण -२०२६/प्र.क्र.२०/समन्वय दि.२३.२.२०२६

उपरोक्त विषयाबाबत शासन पत्र व त्यासोबतचे सहपत्राची पत्राची प्रत सोबत जोडली आहे. कृपया अवलोकन करावे.

एकल महिलांना आर्थिक व सामाजिक स्तरावर अनेक अडचणींचा सामना करावा लागत असल्याने, त्यांच्या पाल्यांना शिक्षणाचा खर्च उचलणे त्यांचेसाठी अत्यंत जिकीरीचे ठरत असल्याने, एकल महिलांच्या मुला-मुलींना उच्च शिक्षणासाठी विशेष सवलती व सहाय्य उपलब्ध करून देण्याकरीता, तसेच उच्च शिक्षणासाठी शहरांमध्ये वास्तव्य करण्यासाठी शासकीय वसतिगृहांमध्ये एकल महिलांच्या पाल्यांसाठी निश्चित प्रकरणात जागा राखीव ठेवण्याबाबत धोरण निश्चित करण्याबाबत श्री कुलकर्णी यांनी निवेदन दिले आहे. एकल माहिलांच्या पाल्ये या काहीशा दुलक्षित असलेल्या घटकाच्या सर्वागीण विकासाच्या दृष्टीने काही निर्णय होणे आवश्यक आहे.

त्यानुषंगाने, विद्यापीठ स्तरावरील शासकीय/ अशासकीय अनुदानित महाविद्यालयांची माहिती पुढील विहित प्रपत्रामध्ये भरुन विभागीय सहसंचालकांमार्फत तात्काळ संचालनालयाच्या mavi.dhepune@nic.in या ईमेल आयडीवर सादर करण्यात यावी.

| जिल्हा | तालुका | अभ्यासक्रमाचे नाव | महाविद्यालयाचे नाव | एकल माहिलांच्या मुलांची संख्या | एकल माहिलांच्या मुलीची संख्या | या विद्यार्थ्यांपैकी वसतीगृह आवश्यकता असणारी संख्या | एकल माहिलांच्या पालयापैकी SC/ST/NT/DT/OBC/ Minority संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

Digitally signed by
SHAILENDRA KAMLAKAR DEOLANKAR
Date: 10-03-2026 13:36:57

(डॉ. शैलेंद्र देवळाणकर)
प्र.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे -१६.

प्रतः-१. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण
१/- यांना कळविण्यात येते की, उपरोक्त माहिती विद्यापीठांकडून प्राप्त करुन घेवून सदर माहिती अचूक असल्याचे प्रमाणित करुन संचालनालयास सादर करावी.

1/1770427/2026

(CLR)/10/2026-COLLWG1

E.NO- 1560179

जा. क्र. मंत्री/उ. व तंत्र शि. सं. कार्य/
व्ही. आय. पी./मुं./ 924/2026

**मंत्री**

**उच्च व तंत्रशिक्षण, संसदीय कार्य**
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
*cbpatil.minister@gmail.com*

दिनांक : ~~०५ फेब्रुवारी, २०२६~~
10 FEB 2026

मंत्री
महाराष्ट्र शासन

अ.मु.स.
उच्च व तंत्र शिक्षण
यांचे कार्यालय
क. 266
दि. 10/2/26

श्री.हेरंब कुलकर्णी, लेखक व सामाजिक कार्यकर्ता-राज्य निमंत्रक, साऊ एकल महिला समिती, महाराष्ट्र राज्य यांच्याकडून एकल महिलांच्या पाल्यांना उच्च शिक्षण क्षेत्रात भेडसावणाऱ्या अडचणींबाबत मदत करणे विषयीचे स्वयंस्पष्ट निवेदन सोबत जोडले आहे.

एकल महिलांना आर्थिक व सामाजिक स्तरावर अनेक अडचणींचा सामना करावा लागत असल्यामुळे त्यांच्या पाल्यांच्या शिक्षणाचा खर्च उचलणे त्यांच्यासाठी अत्यंत जिकरीचे ठरत असल्याने एकल महिलांच्या मुला-मुलींना उच्च शिक्षणासाठी विशेष सवलती व सहाय्य उपलब्ध करून दिल्यास समाजातील या दुर्लक्षित घटकांना मोठा आधार मिळेल असे निवेदनात नमुद करण्यात आले आहे.

त्याचप्रमाणे, उच्च शिक्षणासाठी शहरांमध्ये वास्तव्य करण्यासाठी लागणारा खर्च हा एकल महिलांच्या कुटुंबांसाठी मोठे आव्हान ठरत असल्याने शासकीय वसतिगृहांमध्ये एकल महिलांच्या पाल्यांसाठी निश्चित प्रमाणात जागा राखीव ठेवण्याबाबत देखील त्यांनी प्रस्तुत निवेदनाद्वारे विनंती केली आहे.

निवेदनात उपस्थित करण्यात आलेले मुद्दे तसेच, समाजातील एकल महिलांची पाल्ये या काहिशा दुर्लक्षित असलेल्या घटकाच्या सर्वांगिण विकासाच्या दृष्टीने काही निर्णय घेणे आवश्यक वाटते. या करिता निवेदनात सुचविण्यात आल्याप्रमाणे आपल्या अधिनस्त सर्व संचालनालये, विद्यापीठे व संस्थांकडून आवश्यक माहिती उपलब्ध करुन घेण्याबाबत आपल्यामार्फत सर्व संबंधितांना योग्य त्या सूचना निर्गमित करण्यात याव्यात.

C.B.Patil
(चंद्रकांत (दादा) पाटील)

प्रति,

अपर मुख्य सचिव,
उच्च व तंत्रशिक्षण,
महाराष्ट्र शासन.

उ.स. (म.शि.)
कृ. तातडीने सादर करावे
10/2/26

चर्चा केली. सर्व संचालनाल
विभागनिहाय संबंधित असल्याने उ.स.(
यांनी कार्यवाही करावी

उ.स.(स्तम)

का अ (मा.शि.)

**हेरंब कुलकर्णी**
लेखक व सामाजिक कार्यकर्ता
संपर्क : ८२०८५८९१९५

राज्य निमंत्रक,
साऊ एकल महिला समिति
महाराष्ट्र राज्य

---

**माननीय चंद्रकांतदादा पाटील**

उच्च व तंत्रशिक्षण मंत्री महाराष्ट्र

विषय : **एकल महिलांच्या पाल्यांना उच्च शिक्षणात मदत करावी यासाठी विनंती**

महोदय,

एकल महिलांच्या प्रश्नावर पुण्यात आपली भेट घेतली **तेव्हा आपण अतिशय संवेदनशील प्रतिसाद** दिला होता. आपल्या त्या चर्चेनुसार विनंती करतो

१ ) मुलींसाठी मोफत शिक्षणाचा निर्णय घेऊन आपण अतिशय महत्वाचा निर्णय घेतला आहे.या निर्णयाचा लाभ एकल महिलांच्या मुलांना देण्याचा निर्णय आपण घेतला तर नक्कीच एकल महिलांच्या मुलांना शिक्षणात मदत होऊ शकेल कारण एकल महिलांसाठी या मुलांना शिक्षण देणे अतिशय कठीण असते.

२) एकल महिलांच्या मुलांना आणि मुलींना शहरात शिकायला ठेवण्याचा खर्च एकल महिलांना परवडत नाही. त्यामुळे शासकीय वसतिगृहात एकल महिलांच्या मुलांना आणि मुलींना काही जागा राखीव ठेवण्याची शिफारस आपण संबंधित विभागाला व अधिनस्त महाविद्यालय यांना करावी

आपण एकल महिलांच्या मुलांच्या शिक्षणासाठी आणखी काही निर्णय घ्यावेत ही विनंती

आपला विश्वासू,

राज्य निमंत्रक, साऊ एकल महिला समिती,
महाराष्ट्र राज्य